# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : ५६९६०६१
तारेचा पत्ता : 'युनिपुना'
ई मेल: pgadmis@unipune.ernet.in

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ : शै.प्रवेश/ 7185

दिनांक : 3 जून, २००८

प्रति,

१. मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये.

२. मा.विभागप्रमुख,
पुणे विद्यापीठ, पुणे ७.

**विषय : क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती विद्यार्थिनींना देण्याबाबत..**

महोदय / महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, पुणे विद्यापीठाने सन २००७ पासून क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेसाठी अर्थसंकल्पात रु.२ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून शैक्षणिक वर्ष सन २००८-०९ करिता आपल्या महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमासाठी फक्त १० व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ०५ विद्यार्थिनींच्या नावाची शिफारस करण्यात यावी. पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विहित नमुन्याचा तक्ता उपलब्ध असून सदर तक्त्यात माहिती भरून पाठविण्यात यावी. सोबत सदर शिष्यवृत्तीचे नियम आहेत. त्याप्रमाणे संकेतस्थळावर उपलब्ध असलेला अर्ज भरून पाठवावा. अर्जासोबत सन २००८-०९ चा उत्पन्नाचा दाखला, गुण पत्रिका, जातीचा दाखला, देवदासी, वारांगणा, एड्सग्रस्त असल्याची कागद पत्रे साक्षांकित करून पाठविण्यात यावीत. रु.७५,०००/- पर्यंत उत्पन्न असलेल्या विद्यार्थिनींनाच सदर योजनेचा लाभ देण्यात येईल. **तसेच ज्या विद्यार्थिनींना इतर कोणतीही शिष्यवृत्ती मिळत नाही अशा विद्यार्थिनींचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.** तरी कृपया आपणांस विनंती करण्यात येते की, आपण सदर पत्रातील आशय लक्षात घेवून व नियमांचे काटेकोर पालन करून विद्यार्थिनींच्या नावाची शिफारस करावी.

अर्ज स्वीकारण्याची **अंतिम मुदत १ ऑक्टोबर, २००८** आहे. सदर शिष्यवृत्तीचे अर्ज पुणे विद्यापीठात समक्ष सादर करावेत. मुदतीनंतर आलेले व पोस्टाने आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तरी सदर अर्ज **दिनांक १ ऑक्टोबर, २००८ पर्यंत** कार्यालयात सादर करावेत.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव,
शै.प्रवेश (म.वि.वि.मं.)

# क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती.

१. फक्त ५० टक्केच्या पुढे मार्कस असणा-या विद्यार्थिनींचे अर्ज स्विकारावेत.
२. उत्पन्न रु.७५,०००/- असणा-या विद्यार्थिनींचे अर्ज स्विकारावेत.
३. प्रत्येक महाविद्यालयाकडून फक्त पदवीचे १० आणि पदव्युत्तरचे ०५ अर्ज स्विकारावेत.
४. सदर शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थिनीच्या शैक्षणिक कालखंडात विद्यार्थिनींला एकदाच मिळेल.
५. अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत १ ऑक्टोबर अशी राहील. सदर शिष्यवृत्तीचे अर्ज पुणे विद्यापीठात समक्ष सादर करावेत. मुदतीनंतर आलेले व पोष्टाने आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
६. ज्या विद्यार्थिनींना इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचे लाभ मिळत नाहीत अशाच विद्यार्थिनींच्या अर्जाचा प्राधान्याने विचार केला जाईल.
७. ग्रामीण पार्श्वभूमी, शैक्षणिक गुणवत्ता, घटस्फोटित, विधवा, आर्थिक दुर्बल, सामाजिक मागासलेपणा अशा विद्यार्थिनींचा तसेच देवदासी, वारांगना, एड्सग्रस्त मातांच्या मुलींचा प्रकर्षाने विचार केला जाईल.
८. ७० टक्के पदवीपूर्व विद्यार्थिनी (घटस्फोटित, विधवा विद्यार्थिनी तसेच देवदासी, वारांगना, एड्सग्रस्त मातांच्या मुलींना प्राधान्य.)
   ३० टक्के पदव्युत्तर विद्यार्थिनी (घटस्फोटित, विधवा विद्यार्थिनी तसेच देवदासी, वारांगना, एड्सग्रस्त मातांच्या मुलींना प्राधान्य.)
९. एम.फिल., पीएच.डी. तसेच व्यावसायिक व तंत्रशिक्षण विद्याशाखांव्यतिरिक्त इतर सर्व विद्याशाखांचे अर्ज सदर शिष्यवृत्तीसाठी स्विकारावेत.

**(टीप : या सर्व नियमांचे पालन प्राचार्यांनी काटेकोरपणे करावे. याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांवर राहील.)**

| |
|---|
| फोटो |

# क्रांतिज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती योजनेसाठी करावयाचा अर्ज.

<u>अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख : १ ऑक्टोबर, २००</u>

(१) महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ------------------------------------------------

(२) विद्यार्थिनीचे संपूर्ण नांव : ------------------------------------------------

(३) वडिलांचे/पालकांचे संपूर्ण नांव : ------------------------------------------------

(४) आईचे संपूर्ण नांव : ------------------------------------------------

(५) कायमचा पत्ता : ------------------------------------------------

(६) सध्याचा पत्ता : ------------------------------------------------

(७) अर्जदाराची जन्मतारीख व वय : ------------------------------------------------

(८) विवाहित असल्यास पतीचे नांव : ------------------------------------------------

(९) प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नांव : ------------------------------------------------

(१०) मागील वर्षी मिळालेल्या गुणांची : ------------------------------------------------
टक्केवारी (गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत जोडावी)

(११) पालकाचे वार्षिक उत्पन्न : ------------------------------------------------
(उत्पन्नाच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत जोडावी)

अर्जदाराची सही

प्राचार्यांची शिफारस आणि
सही व शिक्का

<u>टीप</u> : १. प्रत्येक महाविद्यालयाने प्राधान्यक्रमाने पदवीपूर्व १० व पदव्युत्तर ०५ विद्यार्थिनींची नांवे कळवावीत.

२. वरील नमूद केलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करुनच शिष्यवृत्ती देण्याबाबत प्राचार्यांनी शिफारस करावी.

## क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्तीसाठी पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिंनींच्या नावाचा तक्ता.

| अ.क्र. | विद्यार्थिनीचे नांव | महाविद्यालयाचे नांव | अभ्यासक्रम, गुण/टक्के | वार्षिक उत्पन्न | इतर शिष्यवृत्ती | शिफारस. देण्यात यावी/ येवू नये. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |